!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## गावांचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल खासदार चंद्रकांत खैरे यांचे प्रतिपादन

### सांसद आदर्श ग्राम योजनेत दत्तक घेतलेल्या

### पालखेडच्या विकासासाठी २ कोटी खासदार निधी

संभाजीनगर दि-६ "वाढत्या शहरांवरील वाढत्या स्थलांतरांमुळे नागरी समस्यांवरील बोजा वाढत असुन खेडी ओस पडत आहेत. गावांचा विकास झाला आणि शाश्वत शेतीवरील शेतकऱ्यांचा विश्वास वाढील लागण्यासाठी सरकारने सकारात्मक प्रोत्साहन दिल्यास गावांबरोबर देशाचाही विकास होईल". असे प्रतिपादन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत कार्यरत क्षेत्रीय प्रयार कार्यालयातर्फे 'सांसद आदर्श ग्राम' पालखेड येथे आयोजित विशेष कार्यक्रमात खासदार चंद्रकांत खैरे बोलत होते. वैजापुर तालुक्यातील पालखेड हे गाव खासदार चंद्रकांत खैरे यांनी दत्तक घेतले आहे. याप्रसंगी पुढे बोलतना खासदार चंद्रकांत खैरे म्हणाले की, "शेती" हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आजही मुख्य कणा आहे. गेल्या काही वर्षामधील अवर्षणा बरोबरच बँकांची शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यातील उदासिनता यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता. तसेच, गावांच्या विकासासाठी मूलभूत सुविधा पुरविण्यातील दिरंगाई यामुळे गावे बकाल होण्याच्या मार्गावार होती., असे सांगून खासदार चंद्रकांत खैरे यांनी पालखेड या गावाच्या विविधांगी विकासासाठी दीड कोटी रुपयांचा खर्च करणार असल्याचे विवेचन केले.

केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी क्षेत्रीय प्रचार संचालनालयातर्फे विशेष प्रचार मोहीम देशभरात राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पालखेड येथे विशेष प्रदर्शन आणि शिबीर आयोजित केले होते. त्या अंतर्गत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे आरोग्य तपासणी शिबीर, डोळे तपासणी, पशू संवर्धन विभागातर्फे शेतकऱ्यांना कडबाकट्टी यंत्रांचे वाटप, जिल्हा अग्रणी बँक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आणि संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकांतर्फे लाभार्थ्यांना विविध योजनांचे धनादेश देण्यात आले. तसेच, हैद्राबाद बँकेतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे, वाटप करण्यात आले. पोस्ट खात्याच्यावतीने 'डाक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. महिला व बाल विकास प्रकल्प, वैजापूर यांच्यातर्फे पोषण आहाराचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तर नेहरु युवा केंद्रातर्फे शिवसेना उपनेते खासदार  चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले.

या कार्यालयास मुख्य पाहुणे म्हणून वैजापूरचे माजी आमदार आर. एम. वाणी, जि. प. संभाजीनगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड, उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, तालुकाप्रमुख रमेश बोरणार, जि. प. गटनेते मनाजी मिसाळ, जि. प. सदस्य शिवाजी काळे, क्षेत्रीय प्रचार कार्यालयाचे सहाय्यक संचालक शाहू पाटोळे, पशू संवर्धन विभागाचे श्री. आठवले, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक जी. जी. वाकडे, वैजापूरचे प्रांत अधिकारी लक्ष्मीकांत साताळकर, तहसीलदार सुमन मोरे, अन्य विभागांचे अधिकारी तसेच अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते स्पर्धामधील विजेत्यांना पारितोषिके आणि विविध लाभार्थ्यांना धनादेश व मंजुरीपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदकुमार पाटील जाधव यांनी केले. तर मान्यवरांचे स्वागत पालखेडच्या सरपंच वर्षा नंदकुमार पाटील जाधव यांनी केले.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525